I.O प्रत. 2

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस ठाणे, मुरुड जि. ला

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** लातूर **P.S.(ठाणे):** मुरुड
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0045 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/02/2025 20:46

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 18/02/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 18/02/2025
**Time From (वेळेपासून):** 10:26 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 10:26 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/02/2025 **Time (वेळ):** 20:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/02/2025 20:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 22 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा मध्यवती सहकारी ,बँक शा खा-शिराळा चे बाजुस , आरोपी बसत असलेल्या ठिकाणी ,मौ शिराळा ता जि लातुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

(4)



6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): रामप्रसाद सतिश बर्डे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1995

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शिराळा ,लातुर ,मुरुड,लातूर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शिराळा ,लातुर ,मुरुड,लातूर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8600577253

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अरुण ज्ञानोबा सुरवसे | | | 1. शिराळा, लातुर,मुरुड,लातूर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु दराच्या भारतीय चलनी नोटा 30 | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**
15,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 18/02/2025

फिर्याद

मी रामप्रसाद सतिश बर्डे, वय 30 वर्ष व्यवसाय शेती, रा. शिराळा ता. जि. लातूर मो.नं. 8600577253, आधार कार्ड नं.243894010508 असा आहे.

समक्ष फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दिनांक 14/02/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर येथे पोलीस उपअधीक्षक श्री संतोश बर्गे साहेब यांच्या कार्यालयात जावून त्यांची भेट घेवून एका लोकसेवकाविरुध्द लाच मागणीची माझी तक्रार असल्याचे तोंडी सांगितले होते. त्यांनी मला दिनांक 17/02/2025 रोजी 10.00 वा. चिंचोली (बल्लाळनाथ), ता.जि. लातूर गावचे शिवारात सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने येण्यास सांगीतले होते.

त्याप्रमाणे दिनांक 17/02/2025 रोजी सकाळी 10.00 वा. सुमारास वरीलप्रमाणे सांगितलेल्या ठिकाणी हजर आलो. तेथे पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे खाजगी वाहनाने त्यांचे कर्मचारी व दोन पंचासह हजर होते.त्यांनी मला सापळा पथकातील सदस्य व पंचांची ओळख करून देवुन त्यांचेसमक्ष माझे नाव, गाव विचारले असता मी त्यांना माझे नाव वरीलप्रमाणे सांगुन माझी तोंडी तक्रार सांगुन सविस्तर लेखी तक्रार दिली, ती खालीलप्रमाणे.

"मी वरीलप्रमाणे राहणार असुन शेती करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी माझी आई शांताबाई सतिश बर्डे व माझी चुलती सोनाबाई जनक बर्डे यांचे नावे मौजे शिराळा ता.जि. लातूर येथील शेत सर्वे नं. 56 मधील शेतामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहीर सामुहिक सिंचन विहीरीसाठी प्रस्ताव शिराळा ग्रामपंचायतीतील ग्रामरोजगार सेवक सुरवसे साहेब यांचेकडे जानेवारी/2025 मध्ये सादर केला होता. मी माझे आईचे व चुलतीचे नावे सादर केलेल्या सामुहिक सिंचन विहीरीचा प्रस्ताव मंजुर झाला अथवा कसे याबाबत विचारणा करण्यासाठी आमचे गावचे ग्रामरोजगार सेवक बसत असलेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या बाजुच्या गाळ्यात जावुन त्यांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी सिंचन विहीरीचा प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास सादर करून मंजुरी प्राप्त करून देण्यासाठी 15,000/-रू. द्यावे लागतील असे सांगीतले. त्यावर मी माझे घरी येवुन माझी आई व चुलती यांचेशी चर्चा केल्यानंतर मला ग्रामरोजगार सेवक सुरवसे मागत असलेली रक्कम ही लाच असल्याची खात्री झाली. माझी आई व चुलती या वयस्कर महिला असल्याने तसेच मौजे शिराळा गाव लातूर पासुन खुप दुर असल्याने माझी आई व चुलती यांनी त्यांचे वतीने मला तक्रार देण्यासाठी अधिकारपत्र दिले आहे. त्यामुळे मी त्यांचेवतीने लाचेची तक्रार एसीबी कार्यालयास देत आहे.

माझी आईचे व चुलतीचे नावावरील सामुहिक सिंचन विहीरीचा प्रस्ताव सादर करून खुप दिवस झालेले असतांना व तो मंजुर केला नसल्याने मी आजरोजी माझे वरील कामासाठी मौजे शिराळा ग्रामपंचायत येथील ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांची भेट घेणार आहे. सदर भेटीदरम्यान ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कायदेशीर कार्यवाही होणेस विनंती आहे. माझा संबंधीत ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांचेशी कसलाही आर्थिक तथा देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही, बाकी नाही अथवा माझे त्यांचेशी काही वैर नाही.'' अशा आशयाची मी दिलेली तक्रार सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक श्री संतोश बर्गे साहेब व पंचांनी वाचुन पाहुन त्यावर स्वाक्ष-या केल्या आहेत.

त्यानंतर मी पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांचे सांगणेप्रमाणे ग्रामरोजगार सेवक सुरवसे हे गावात आहेत अथवा कसे याबाबत माहिती घेतली असता, ग्रामरोजगार सेवक हे बाहेरगावी गेल्याचे व सायंकाळी गावात येणार असल्याचे समजले. त्यानंतर सापळा अधिकारी बर्गे साहेब व त्यांचे पथक असे सर्वजण सायंकाळी पुढील कार्यवाही

करण्याचे ठरवुन ला.प्र.वि. कार्यालय, लातूर येथे परत आलो.

दि.17/02/2025 रोजी सायंकाळी सापळा अधिकारी व सापळा पथक असे चिंचोली (ब.), ता.जि. लातूर गावचे शिवारात सापळा कार्यवाही करण्याचे अनुशंगाने गेलो. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी मी दिलेल्या तक्रारीच्या अनुशंगाने मौजे शिराळा ता. जि. लातूर येथील ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांनी मला माझ्या वर नमुद कामाकरीता म्हणुन लाचेची मागणी केली आहे अगर कसे? यांची पडताळणी करुन ती ध्वनीमुद्रीत करण्याचे ठरवले. सापळा अधिकारी बर्गे साहेब यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बाबत मला व पंचांना माहिती सांगुन, ते कोरे असल्याचे खात्री करुन देवुन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये सिलबंद पाकीटातील नविन कोरे मेमरीकार्ड टाकुन माझे व दोन्ही पंच तसेच पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांचे वक्तव्य ध्वनिमुद्रीत करुन पडताळणी करण्याचे ठरवुन सापळा कार्यवाहीबाबत मला व पंचांना तसेच सापळा पथकातील सदस्य यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी मला योग्य त्या सुचना देवून पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 20.36 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन ग्रामरोजगार सेवक सुरवसे बसत असलेल्या ठिकाणी जिल्हा मध्यवर्ती सह. बँक शाखा शिराळा जवळील पत्र्याच्या गाळयामधील ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांचे खाजगी कार्यालयात जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक हे चिंचोली (ब.) शेत शिवारात आडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 पांढरे असे मौजे शिराळा ता. जि. लातूर येथील ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांचे खाजगी कार्यालयाजवळ गेलो असता, कार्यालय बंद असल्याने मी ग्रामरोजगार सेवक सुरवसे साहेब यांचे मोबाईल नंबर क्र. 9822262160 वर माझे मोबाईल क्र. 8600577253 वरुन पंचासमक्ष कॉल करुन स्पीकर मोडवर केला व म्हणालो....हं.. हॅलो म्हणलं.... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले.... बोला.... त्यावर मी म्हणालो....येवु का आता दुकानी....त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले.... जेवण करलालोय.... पंधरा वीस मिनीटात या... त्यावर मी म्हणालो... ठिक हाय येतो... त्यानंतर काही वेळाने ग्रामरोजगार सेवक सुरवसे साहेब व माझी भेट झाली. पांढ-या रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व करडया रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे ग्रामरोजगार सेवक सुरवसे साहेब असल्याचे पंचास ईषा-याने सांगुन त्यांची पंचासमक्ष भेट घेतली. ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांनी माझे वरील नमुद कामाच्या अनुशंगाने पंचासमक्ष माझेशी समोरासमोर चर्चा केली. चर्चे दरम्यान मी ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांना म्हणालो....लय धावपळ दिसायली माग तुमच्या... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले...हं... आपली काय कंडीषन हाय?... त्यावर मी म्हणालो... आपल काय तुम्ही कधी करताव की... लक्षात येईना मला...त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले...तुमच्यावर आमच्यावर काय असतय... आज तीन दाखल केले की....फाईल... पैसे भरायचे पटदिशा ... घ्याच्या मंजुरी कसं असतय ते... त्यावर मी म्हणालो...माझं म्हणणं काहीतर कमी करा की... अॅडजस्ट कराव लागतय... थोडफार तर... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले.... काही नाही... काही नाही... त्यावर मी म्हणालो... तेवढं द्यावचं लागतय म्हणा की... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले.... आम्हाला म्हणता आलं नसतं का?... मग निघल तेवढे पैसे काढीत गेलो असतो की... तुमच्याकुन पंधरा, हच्याकुन वीस... त्यावर मी म्हणालो.... किती द्यायचे मग?...फायनल सांगा बरं... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले... आता आमच्याकडं पंधरा द्यायचे... त्यावर मी म्हणालो.... तुमच्याकडं पंधरा हजार... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले.... पंचायत सोडुन पंधरा हजार...त्यावर मी म्हणालो.... पंधरा हजार पेक्षा काही कमी होतच नाय का?ं....त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले...तेच सांगायलोय तुम्हाला... करून घ्याचं काम देवुन... दहा पाच मिनीटात... त्यावर मी म्हणालो.... मग उद्यालाच.... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले...तयारी करा... इकडुन तिकडुन करा.. भरपुर मोठी योजना काय.... काय लहान नाही... त्यावर मी म्हणालो.... बरं ठिक हाय चालतय मग... उद्यालाच देवु का मग?....का थोडेफार हायतं घेवुन येवु आता? का उद्याच देवु? त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले...उद्या सगळेच द्या... असे म्हणून लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले. त्यावर मी म्हणालो... येवु का मग... उद्या येतो मग... असे म्हणून मी व पंच क्रमांक 1 पांढरे असे तेथुन निघून बाहेर येवुन सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 21.23 वाजताचे सुमारास आलो असता पोकॉ कोंडरे यांनी माझेकडील व्हाईस रेकॉर्डर घेवून बंद केले. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी माझ्या समक्ष पंच क्रमांक 1 पांढरे यांना लाचेची मागणीच्या अनुशंगाने माझ्यात व ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांच्यात काय बोलणे झाले? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 पांढरे यांनी मी वर नमुद केल्याप्रमाणे हकीकत सांगितली. आम्ही सर्वांनी व्हॉईस रेकॉर्डर हाताळणारे पोलीस कर्मचारी कांडरे यांचे मार्फतीने डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्यात व ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांच्यात झालेले संभाषण ऐकले. सदर संभाषण हे पंच क्रमांक 1 पांढरे यांनी सांगितलेल्या हकीकतीप्रमाणे असल्याचे खात्री करुन ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांनी माझ्या वर नमुद कामासाठी माझ्याकडे 15,000/- रुपये लाचेची स्वतः मागणी करुन लाचेची रक्कम उदईक रोजी घेवुन येण्यास

सांगितल्याने आम्ही सर्वानुमते त्यांचे विरुध्द 15,000/- रुपये लाचेची सापळा कार्यवाही उदईक रोजी करण्याचे ठरविले.

आज दिनांक 18/02/2025 रोजी पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी बोलावले वरून चिंचोली (बल्लाळनाथ) शेत शिवारात मी हजर आलो. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी मला ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांना देण्यासाठी लाचेची रक्कम हजर करणेबाबत कळविले असता मी माझेकडील 500/-रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा असे एकुण 15,000/-रुपये समक्ष हजर केले. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी मला व पंचाना अॅन्थ्रासीन पावडरचा वापर, गुणधर्म याबाबत माहिती व प्रात्यक्षीक करुन दाखविले. मी हजर केलेल्या नोटांना पोकॉ/जाधव यांनी अॅन्थ्रासीन पावडर लावुन माझ्या अंगातील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवुन लाचेची रक्कम दिल्यानंतर आपल्या गळयातील मफलर काढुन तोंड पुसणे बाबतचा सुनियोजीत ईशारा करणेबाबत सांगण्यात आले. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी मला, दोन्ही पंच व सापळा पथकातील सदस्य यांना पुढील सापळा कार्यवाही बाबत पुन्हा सुचना दिल्या. त्यानंतर पोकॉ/1759 कोंडरे यांचे मार्फतीने 10.16 वा. डिजीटल व्हॉईस रेकॉर्डचे बटण चालु करुन माझ्या गळयात अडकावुन मौजे शिराळा ता.जि. लातूर येथील ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांचे खाजगी कार्यालयात ग्रामरोजगार सेवक सुरवसे साहेब बसत असलेल्या ठिकाणी जाण्यास सांगितले. सापळा अधिकारी व सापळा पथक ग्रामरोजगार सेवक सुरवसे बसत असलेल्या कार्यालयाच्या आजुबाजुस कोणाच्या नजरेत येणार नाही असे अडबाजुस थांबुन राहिले. त्यानंतर मी व पंच क्रमांक 1 पांढरे असे ग्रामरोजगार सेवक सुरवसे बसत असलेल्या खाजगी कार्यालयात जावुन ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांची भेट घेतली. चर्चेदरम्यान मी म्हणालो.... नमस्कार सुरवसे साहेब... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले... नमस्कार... काय चालु हाय फाईली.... त्यावर मी म्हणालो... काल तुम्ही बोलल्याप्रमाणे आणले होते... त्यावर ग्रामरोजगार सेवक सुरवसे म्हणाले... आणलेत का?... त्यावर मी म्हणालो... हं.. पंधरा हजार रुपये .... पंधरा द्यायचे का मग? चालतय धरा मग... मोजुन घ्या... असे म्हणुन 500/-रुपये दराच्या 30 भारतीय चलनी नोटा असे एकुण 15,000/-रुपये ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांचे समक्ष धरले असता, ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांनी मला लाचेची रक्कम ही त्यांचे कार्यालयात त्यांचे समोर वैयक्तीक कामासाठी बसलेल्या आमचे गावातील श्री आदेश भास्कर सवई, वय 30 वर्ष, रा. शिराळा ता.जि. लातूर यांचेकडे देण्यास सांगीतली व आदेश सवई यास मोजण्यास सांगीतले. त्यानंतर मी ग्रामरोजगार सेवक सुरवसे साहेब यांनी सांगीतल्याप्रमाणे लाचेची रक्कम श्री आदेश सवई यांना दिली. ती रक्कम सवई यांनी घेवुन मोजले व ते पंधरा... असल्याचे सांगुन ग्रामरोजगार सेवक श्री सुरवसे साहेब यांचे समोर धरले असता ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांनी सदर लाचेची रक्कम 10.26 वाजण्याच्या सुमारास पंचासमक्ष उजव्या हाताने स्वीकारून ते बसत असलेल्या समोरील टेबलावर ठेवले. त्यानंतर मी ठिक हायं... असे म्हणुन नियोजीत लाचस्विकृतीचा इशारा केला. त्यानंतर लगेच सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब, पोलीस निरीक्षक भास्कर पुल्ली साहेब हे पंच क्र. 02 बैले व सापळा पथकातील सदस्यासह माझे जवळ आले. माझेकडील व्हाईस रेकॉर्ड पोलीस कर्मचारी कांेडरे यांचेकडे दिले ते त्यांनी 10.27 वाजण्याच्या सुमारास घेवुन बंद केले. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी पंच क्रमांक 1 पांढरे यांना लाचेची रक्कम कोणी स्विकारली? याबाबत विचारणा केली असता पंच क्रमांक 1 पांढरे यांनी समोर पांढ-या रंगाचा फुल बाहयाचा शर्ट व करडया रंगाची पॅन्ट घातलेली व्यक्ती हे ग्रामरोजगार सेवक सुरवसे असुन त्यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही त्यांचे कार्यालयात त्यांचे समोर वैयक्तीक कामासाठी बसलेल्या आमचे गावातील श्री आदेश भास्कर सवई यांचेकडे देण्यास सांगीतली व आदेश सवई यास मोजण्यास सांगीतले. त्यानंतर मी आदेश सवई यांना दिलेले पैसे आदेश सवई यांनी घेवुन मोजले व ग्रामरोजगार सेवक श्री सुरवसे साहेब यांचे समोर धरले असता ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांनी सदर लाचेची रक्कम पंचासमक्ष उजव्या हाताने स्वीकारून त्यांचे समोरील टेबलावर ठेवली. मी वर सांगीतलेल्या हकीकतीप्रमाणे मिळती जुळती हकीकत पंच क्रमांक 1 पांढरे यांनी सांगीतली. त्यावेळी सापळा अधिकारी पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी त्यांचेकडील ओळखपत्र ग्रामरोजगार सेवक सुरवसे यांना दाखवून त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अरूण ज्ञानोबा सुरवसे, वय 52 वर्षे, पद ग्रामरोजगार सेवक, इलोसे, नेमणुक ग्रामपंचायत शिराळा, ता. जि. लातूर मुळ रा. शिराळा ता. जि. लातुर असे असल्याचे सांगितले. पोलीस उपअधीक्षक संतोश बर्गे साहेब यांनी पंच क्रमांक 2 बैले यांचे हस्ते आरोपी अरूण ज्ञानोबा सुरवसे, पद-ग्रामरोजगार सेवक यांच्या जवळील लाचेची रक्कम काढुन घेवुन पंच क्रमांक 1 पांढरे यांचे मार्फतीने सापळा कार्यवाही दरम्यान लिहुन घेण्यात आलेल्या नोटांचे वर्णन व नंबरशी पडताळून पाहीले असता ते एकच असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर आरोपी अरूण ज्ञानोबा सुरवसे यांना ताब्यात घेवुन तेथील आवष्यक ती सापळा कार्यवाही करुन सदर ठिकाणी गर्दी होत असल्याने पुढील कार्यवाही करणेकरीता घटनास्थळावरुन रवाना होवून लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, लातूर येथे येवुन पुढील कार्यवाही पुर्ण केली आहे.

(8)



तरी यातील आरोपी अरूण ज्ञानोबा सुरवसे, वय 52 वर्ष पद ग्रामरोजगार सेवक, इलोसे, नेमणुक ग्रामपंचायत शिराळा, ता. जि. लातूर मुळ रा. शिराळा ता. जि. लातुर यांनी माझी आई शांताबाई सतिष बर्डे व माझी चुलती सोनाबाई जनक बर्डे यांचे नावे मौजे शिराळा ता.जि. लातूर येथील शेत सर्वे नं. 56 मधील शेतामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत अहिल्यादेवी सिंचन विहीर सामुहिक सिंचन विहीरीसाठी सादर केलेला प्रस्ताव वरीष्ठ कार्यालयास सादर करून मंजुरी प्राप्त करून देतो म्हणुन दि.17/02/2025 रोजी पंचासमक्ष 15,000/-रू. लाचेची मागणी करून 15,000/-रूपये लाचेची रक्कम दि.18/02/2025 रोजी आरोपी यांचे जिल्हा मध्यवती सहकारी बँक शा खा-शिराळा ता. जि. लातूर च्या बाजुस असलेल्या त्यांचे खाजगी कार्यालयात 10.26 वा. चे सुमारास पंचासमक्ष स्वतः स्विकारली आहे व त्याबाबत कोणतीही पावती दिलेली नाही, म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर तक्रार आहे.

मी वर नमुदप्रमाणे सांगितलेली तक्रार ही पोकॉ जाधव यांनी लॅपटॉपवर टंकलिखीत केली असुन, ती वाचुन पाहिली. मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष ही फिर्याद दिली.

(संतोश बर्गे)
पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ASHOK NAMDEV UJGARE(SI (Sub-Inspector)) / 15101000402ANUM8601T **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): ASHOK NAMDEV UJ(
**Rank**(पद): SI (Sub-Inspector)
**No.**(सं.): 15101000402ANUM86(

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे मुरुड

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)